महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११४ वे | दिनांक : १९/०४/२०२६ | वार रविवार

## काँग्रेसने महिला आरक्षण विधेयकात खोडा घालण्याचे कारण नव्हते : अशोक चव्हाण



**मुंबई** : महिला आरक्षण विधेयकावरून कॉंग्रेस पक्षाने माजी मुख्यमंत्री व भाजपचे खासदार अशोक चव्हाण यांच्यावर टीका केली होती. त्यावर आता चव्हाण यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. आपण कोणावरही वैयक्तिक टीका केली नाही. परंतु, कॉंग्रेसने महिला आरक्षण विधेयकामध्ये खोडा घालण्याचे कारण नव्हते, असे चव्हाण यांनी म्हटले. तसेच लोकसभेचे मतदारसंघ अवाढव्य झाले आहेत. ते आता सुटसुटीत केले पाहिजेत यात गैर काय? मतदारसंघात समानता आणली पाहिजे, असेही चव्हाण यांनी म्हटले. अशोक चव्हाण म्हणाले की, मला मान्य आहे की कॉंग्रेसच्या काळात महिलांना आरक्षण द्यायचा निर्णय झाला, ते कोणी नाकारत नाही. पण आता जे महाभाग माझ्यावर टीका करतात, त्यांनी लक्षात घेतले पाहिजे की माझी टीका वैतक्तीक नाही. महिला आरक्षणाच्या विधेयकात काल विनाकारण विरोधकांनी खोडा घातला. त्याचे काहीही कारण नव्हते.

पुढे बोलताना अशोक चव्हाण म्हणाले, अमित शहा यांनी प्रत्येक प्रश्नावर स्पष्टीकरण दिले आहे. विरोधकांनी सांगितलेल्या सुधारणा करायलाही ते तयार होते. सरकारची सगळी राजकीय तयारी केली, सर्व स्पष्ट केले. मतदारसंघ पुनर्रचनेततून दक्षिण भारतातील जागा कमी होत नाहीत हे स्पष्ट केले. मग त्याला दोन तृतीयांश बहुमताने पास करण्यासंदर्भात विरोधकांच्या मदतीची आवश्यकता होती. महिला आरक्षणाचा महत्त्वाचा भाग होता. पण निर्णयाचे श्रेय मोदी सरकारला नको म्हणून अडवणूक केली, असे चव्हाण यांनी म्हटले.

अनेक राज्यांत कॉंग्रेसची 20-20 वर्षे झाली, तरी सरकार नाहीत. अनेक राज्यात कॉंग्रेसकडे खाली केडर शिल्लक नाही. महाराष्ट्रात तीच परिस्थिती आहे. केंद्रीय नेतृत्वाला यांच्याशी काही घेणदेणे नाही. कॉंग्रेसला काहीही भवितव्य नाही, त्यामुळे त्यांच्यातील अनेक नेते हे भाजपमध्ये यायला तयार असल्याचे अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना अशोक चव्हाण म्हणाले, मी भाजपमध्ये असलो तरीही कॉंग्रेसच्या विरोधात मुद्यांवर बोलतो. सरकारने घेतलेले निर्णय योग्यच आहेत, कॉंग्रेसकडे काही मुद्दाच राहिला नाही. मी कॉंग्रेस सोडल्यामुळे काही लोकांना चांगले वाटते, कारण मी गेल्याने त्यांना संधी मिळाली. काही लोक खासगीमध्ये सांगतात की भाजपमध्ये यायचे आहे. किती दिवस विरोधात राहायचे असे बोलतात.

कॉंग्रेसने अशोक चव्हाण यांच्यावर टीका करताना म्हटले होते की, ज्या कॉंग्रेस पक्षाशी आपले वडील स्व. शंकरराव चव्हाण साहेब आयुष्यभर एकनिष्ठ राहिलेत, त्याच कॉंग्रेस पक्षासोबत आपण गद्दारी करण्याअगोदर 2023 मध्येच "नारी शक्ती वंदन अधिनियम 2023, म्हणजे लोकसभा व विधानसभेच्या जागांमध्ये महिलांसाठीचे 33 टक्के आरक्षण हे संसदेत एकमताने (कॉंग्रेसच्या पाठिंब्याने) मंजूर झालेले आहे. ते 16 एप्रिल 2026 पासून लागूही झाले आहे.

पुढे कॉंग्रेसने म्हटले की, आपल्या माहितीसाठी, ज्यांच्यामुळे आपण पहिल्यांदा लोकसभेच्या सभागृहात निवडून गेलात त्या स्व. रंजीव गांधी यांनीच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षण लागू केले व नंतर 50 टक्के आरक्षणही कॉंग्रेसच्याच काळात लागू करण्यात आले. खाल्लेल्या मिठाला जागायला शिका, पाठीचा कणा थोडा तरी मजबूत असू द्या, अशी खोचक टीका चव्हाण यांच्यावर कॉंग्रेसने केली होती.

## डेटा सेंटर प्रकल्पांना मिळणार गती : करारानंतर कंपन्यांना तत्काळ जागा मिळणार



**मुंबई** : महाराष्ट्रात डेटा सेंटर क्षेत्राला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला महत्त्वाचे निर्देश दिले असून, मध्य आशियातील नामवंत कंपन्यांकडून येणारी गुंतवणूक लक्षात घेता त्यांना करारानंतर तत्काळ जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या आहेत. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या एका विशेष बैठकीत डेटा सेंटर प्रकल्पांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले, ज्यामध्ये उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग नोंदवला होता.

देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, डेटा सेंटर क्षेत्रातील प्रकल्पांसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यात याव्यात. विशेषतः जमीन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. तसेच डेटा सेंटर प्रकल्पांसाठी अखंड वीजपुरवठा अत्यावश्यक असल्याने संबंधित कंपन्यांना प्राधान्याने वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देशही देण्यात आले. ऊर्जा विभागाने यासाठी आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे फडणवीस यांनी सांगितले आहे.

डेटा सेंटर प्रकल्पांना गती देण्यासाठी सिडकोमार्फत स्वतंत्र 'लॅण्ड बॅंक' विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले असून, वीज उपकेंद्रांसाठी जागा तत्काळ उपलब्ध करून देण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. या प्रकल्पांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सिडकोकडून सुरू असून, डेटा सेंटर्सना लागणारा पुरेसा आणि अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित केला जात असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## संभाजीनगरचा पाणीपुरवठा प्रश्न सोडवणार : मनपा आयुक्त अमोल येडगे यांची ग्वाही



**छत्रपती संभाजीनगर** : महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने नवनियुक्त मनपा आयुक्त अमोल येडगे आणि नवनियुक्त विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचा सत्कार व स्वागत समारंभ शनिवारी संत एकनाथ रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलताना महापौर समीर राजूरकर यांनी जी. श्रीकांत यांच्या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले की, पुरुषोत्तम भापकर यांनी २०१३ मध्ये शहराच्या डीपीवर काम सुरू केले होते, त्याचा कळस श्रीकांत यांनी रस्ते मोकळे करून चढवला. श्रीकांत हे प्रशासनातील 'युझर फ्रेंडली अँड्रॉइड फोन' सारखे होते, ज्यांनी नेहमी आपलेपणा जपला. अतिक्रमण कारवाईत त्यांनी कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून विश्वास दिला. कर्मचाऱ्यांचा विमा काढल्यामुळेच, अनधिकृत बॅनर काढताना अपघाती मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला १.१० कोटींची मदत मिळू शकली. श्रीकांत यांनी नियम पाळताना नगरसेवक पतीवरही गुन्हे दाखल करण्यास मागेपुढे पाहिले नाही.

महापौर राजूरकर यांनी आता अमोल येडगे यांनी हा विकासाचा पाया कळसापर्यंत न्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर नवनियुक्त आयुक्त अमोल येडगे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, प्रोबेशन काळापासून मला जी. श्रीकांत यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांनी केलेल्या कामाची उंची अधिक वाढवण्याचे काम मी करेन. शहराच्या प्रगतीत आता १२५ माजी नगरसेवकांचा अनुभव सोबत असेल. पाणीपुरवठा विभागाच्या कामाला गती देऊन नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवण्यावर माझा भर असेल.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी अत्यंत भावूक होत आपल्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले की, लोक मला विचारायचे की किती दिवस मराठवाड्यात अडकून राहणार? पण या मातीचे माझ्यावर ऋण होते आणि ते फेडण्यासाठीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्र्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून मला ही जबाबदारी दिली. मनपा आयुक्त म्हणून आलो तेव्हा ईडी चौकशी सुरू होती, पण मी डगमगलो नाही. शहराला १० दिवसांनी पाणी मिळते याची मला लाज वाटत होती.

आता विभागीय आयुक्त म्हणून प्रत्येक घराला पाणी देण्यासाठी मी बांधील आहे. पुढच्या तीन वर्षात शहराचा चेहरा बदलेल. अतिक्रमण काढताना कुणाची घरे तोडणे हा आनंद नव्हता, तर शहर मोकळे करणे हा उद्देश होता, असे श्रीकांत यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास आमदार संजय केनेकर, उप महापौर राजेंद्र जंजाळ, विरोधी पक्षनेते समीर बिल्डर, प्रभारी जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने, मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, कल्पिता पिंपळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ एप्रिल २०२६

# सामाजिक क्रांती आणि महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान...

**म**हात्मा बसवेश्वर क्रांतीकारी समाजसुधारक आणि त्यांचे सद्यस्थितीतील विचार.बाराव्या शतकातील कर्नाटकच्या भूमीतून उगम पावलेले महात्मा बसवेश्वर हे केवळ एक धर्मगुरू नव्हते, तर ते एक महान मानवतावादी, अर्थशास्त्रज्ञ आणि लोकशाहीचे आद्य प्रणेते होते. शब्दापेक्षा कृती मोठी असा संदेश देणाऱ्या बसवण्णांनी तत्कालीन विषमतेवर आधारित समाजव्यवस्थेला छेद देऊन समताधिष्ठित समाजाचा पाया रचला.O सामाजिक समतेचा जाहीरनामा : अनुभव मंटपमहात्मा बसवेश्वरांच्या कार्याचे सर्वात महत्त्वाचे केंद्र म्हणजे ' अनुभव मंटप. ' हे जगातील पहिले संसद मानले जाते. येथे जात, धर्म, पंथ आणि लिंगाचा कोणताही भेदभाव न करता सर्वांना आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य होते. 0 समता आणि सामाजिक न्याय : बसवेश्वरांनी जातीनिर्मूलन आणि स्त्री-पुरुष समानता यांचा पाया रचला. आजच्या काळात जेव्हा जातीभेद आणि लिंगभेद हे मोठे सामाजिक प्रश्न आहेत, तेव्हा त्यांचा मानवता हाच खरा धर्म हा विचार सामाजिक सलोखा राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी महिलांना 'अनुभव मंटपात' स्थान देऊन लोकशाही मूल्यांची जपणूक केली, जी आजच्या महिला सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी आहे.0 लोकशाही मूल्ये : सामान्य कष्टकऱ्यांपासून ते विद्वानांपर्यंत सर्वांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांनी सामाजिक लोकशाहीचा प्रयोग यशस्वी केला.0 स्त्री-पुरुष समानता : स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक चर्चेत बरोबरीचे स्थान देऊन त्यांनी स्त्री मुक्तीच्या चळवळीचा पाया रचला. अक्कमहादेवींसारख्या अनेक शरण स्त्रिया याचे ज्वलंत उदाहरण आहेत.0 ' कायकवे कैलास ' आणि आर्थिक विचार : बसवेश्वरांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी ' कायकवे कैलास ' म्हणजे कष्ट हाच कैलास/देव हा मंत्र दिला. कायकवे कैलास (श्रमाचे महत्त्व)' कायकवे कैलास ' म्हणजे ' काम हाच स्वर्ग. ' हा सिद्धांत आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतही लागू होतो.कोणतेही काम लहान किंवा मोठे नसून ते प्रामाणिकपणे करणे, हीच खरी ईश्वरसेवा आहे, हा विचार आजच्या ' वर्क कल्चर 'मध्ये व्यावसायिक नीतिमत्ता (Work Ethics) वाढवण्यासाठी उपयुक्त आहे.स्वतःच्या कष्टावर जगणे आणि इतरांवर विसंबून न राहणे हा स्वावलंबनाचा मंत्र त्यांनी दिला.0 श्रम प्रतिष्ठा : कोणताही व्यवसाय श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो, तर प्रामाणिकपणे केलेले श्रम हीच देवाची पूजा आहे, असे त्यांनी पटवून दिले.0 दसोह संकल्पना : कमावलेल्या संपत्तीचा विनियोग केवळ स्वतःसाठी न करता समाजातील गरजूंसाठी करणे म्हणजे दसोह, हा त्यांचा समाजवादी आर्थिक विचार होता. यामुळे समाजात संपत्तीचे केंद्रीकरण न होता ती प्रवाहित राहिली. दशोह (सामाजिक उत्तरदायित्व) बसवण्णांनी केवळ संपत्ती साठवण्यापेक्षा ती समाजातील गरजूंसाठी खर्च करण्यावर (दशोह) भर दिला. आजच्या काळात ज्याला आपण ' Corporate Social Responsibility ' (CSR) म्हणतो, त्याचे मूळ त्यांच्या ' दशोह ' संकल्पनेत आढळते. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी ही संकल्पना आजही मोलाची ठरते.o वचनांच्या माध्यमातून प्रबोधन : बसवेश्वरांनी त्यांचे विचार कठीण संस्कृतमध्ये न मांडता जनसामान्यांच्या कन्नड भाषेत वचन साहित्यात मांडले. त्यांची वचने अत्यंत साधी पण विचारप्रवर्तक आहेत.0 नैतिकता : चोरी करू नको, हत्या करू नको, खोटे बोलू नको या सप्तसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी मानवी वर्तणुकीची आचारसंहिता मांडली.o भाषेचे लोकशाहीकरण (वचन साहित्य) : त्यांनी तत्त्वज्ञान हे क्लिष्ट भाषेतून बाहेर काढून सर्वसामान्यांच्या भाषेत (वचनांच्या माध्यमातून) मांडले. आजच्या काळात शिक्षण आणि माहिती ही सर्वसामान्यांच्या भाषेत असावी, हे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी त्यांचे हे कार्य दीपस्तंभासारखे आहे.0 मूर्तीपूजा आणि कर्मकांडाला विरोध : त्यांनी बाह्य अवडंबरापेक्षा अंतःशुद्धीला महत्त्व दिले. " देह हेच देऊळ " मानून ईश्वराचा शोध स्वतःमध्ये घेण्याचे आवाहन त्यांनी केले. अंधश्रद्धा निर्मूलन आणि 0 वैज्ञानिक दृष्टिकोन :बसवेश्वरांनी कर्मकांड, मूर्तीपूजा आणि अंधश्रद्धेवर कडाडून प्रहार केला. सद्यस्थितीत समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आणि विवेकनिष्ठ विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांचे विचार दिशादर्शक आहेत.O आधुनिक संदर्भात प्रासंगिकता :आज २१ व्या शतकात जेव्हा जग जातीयवाद, भ्रष्टाचार आणि विषमतेशी झुंजत आहे, तेव्हा बसवेश्वरांचे विचार अधिक मार्गदर्शक ठरतात. 0 जातीअंताची चळवळ : त्यांनी आंतरजातीय विवाहांचे समर्थन करून जातीव्यवस्थेच्या मुळावर घाव घातला होता.0 संसदीय प्रणाली : आजच्या संसदीय लोकशाहीची बीजे त्यांच्या ' अनुभव मंटप ' मध्ये आढळतात. लोकशाही मूल्ये आणि अनुभव मंटप :बसवेश्वरांनी स्थापन केलेले ' अनुभव मंटप ' हे जगातील पहिले संसद मानले जाते. यात समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीला आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य होते.0 सद्यस्थितीतील उपयोग : आजच्या लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सर्वसमावेशक चर्चेची गरज आहे, ज्याचा आदर्श बसवेश्वरांनी ९०० वर्षांपूर्वीच घालून दिला होता.0 श्रमाची प्रतिष्ठा : बेरोजगारी आणि कौशल्याच्या अभावाच्या काळात ' कायक ' तत्वज्ञान युवकांसाठी प्रेरणादायी आहे. सारांश रूपाने असे म्हणता येईल की, महात्मा बसवेश्वर हे केवळ एका विशिष्ट समाजाचे नेते नव्हते, तर ते अखिल मानवजातीचे मार्गदर्शक होते. जगातील प्रत्येक माणूस माझा आहे. इवनु नम्मवा ही वैश्विक बंधुत्वाची भावना त्यांनी रुजवली. त्यांच्या विचारांचा अवलंब करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल." कलुबेड़ा, कोलुबेड़ा, हुसिया नुडिय लुबेड़ा..."चोरी करू नको, हिंसा करू नको, असत्य बोलू नको... हेच ईश्वराला प्रसन्न करण्याचे खरे मार्ग आहेत. महात्मा बसवेश्वरांचे कार्य केवळ एका धर्मापुरते मर्यादित नसून ते मानवतावादाचे वैश्विक तत्त्वज्ञान आहे. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, कष्टकऱ्यांचा सन्मान आणि समताधिष्ठित समाज घडवण्यासाठी त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आहेत.



**प्रा. डॉ. महेश मोटे**
मुरूम, ता. उमरगा, जि. धाराशिव

# संजय रामकृष्ण मडके यांची मुख्याध्यापक पदी नियुक्ती







**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजी नगर या शाळेत श्री संजय रामकृष्ण मडके यांची नियुक्ती महानगरपालिका छत्रपती संभाजी नगर यांच्या शिक्षण विभागाने केलेली असून श्री मडके यांची नियुक्ती झाल्याबद्दल शाळेचे शिक्षक जाहेदखान पठाण, वसंत राठोड, सर्जेराव वाघ, संदीप चव्हाण, सूर्यवंशी, बेबी माळोदे, अर्चना भारद्वाज, अनुजा भिंगोले, मनीषा शिंदे, अरुणा फुलंब्रीकर, मंगल तारो, विद्या सासवडे, कवठेकर या शिक्षकांनी मुख्याध्यापक पदी नियुक्त झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ एप्रिल २०२६


## सावखेडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**सावखेडा** : म.शि.प्र.मंडळ संचलित.नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावखेडा. ता. गंगापूर. जि. छ. संभाजीनगर या उच्च माध्यमिक विद्यालयात विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.शाम धर्माजी जाधव.तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक श्री.राजेंद्र पंडीतराव मूळे हे होते.या कार्यक्रमात मुलांनी सहभाग घेतला व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन कार्याविषयी मत मांडले. छोटेखानी कार्यक्रम पार पडला याप्रसंगी प्राचार्य मुख्याध्यापक श्री जाधव सर यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला.या कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.तसेच प्राध्यापक, शिक्षक, ग्रंथपाल, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत जयंतीचा उत्सव पार पडला. सुत्रसंचलन डॉ वार्षिक गवळी सरांनी केले. आभार मानून कार्यक्रम पार पडला. शब्दांकन डॉ नंदलाल भिमराव बर्डे सर.

## "दान दे" कवितेला राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्य पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर** : पुणे येथील मधुश्री संस्थेच्यावतीने नुकतेच घेतलेल्या २०२६ च्या उत्कृष्ट कविता स्पर्धा घेण्यात आले होते. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बालभारतीच्या पाठ्य-पुस्तकातील प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर यांची वास्तववादी आशयघन असलेली कविता "दान दे" या कवितेला राज्यस्तरीय उत्कृष्ठ काव्य पुरस्कार मिळाला आहे. असे मधुश्री प्रकाशनचे आयोजक पराग रघुनाथ लोणकर आणि अध्यक्ष तथा परीक्षक श्रीमती कविता मेहेंदळे यांनी नुकतेच अय्युब पठाण लोहगावकर यांना प्रशस्तिपत्र पाठवून श्री. पठाण यांचे अभिनंदन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## समतेचे प्रणेते : महात्मा बसवेश्वर



**क्रां**तिसूर्य, समतानायक, जगतज्योती महात्मा बसवेश्वर हे महामानव जन्माला आले. त्यांच्या महान विचाराची आजही सर्वांनाच गरज आहे. कारण या महामानवाने अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जनतेच्या हितासाठी, अस्पृश्यता निवारण्यासाठी, स्त्री पुरुष समानतेसाठी, आयुष्यभर धर्मांध समाजाच्या विरोधात लढा दिला. महात्मा बसवेश्वर (१२ वे शतक) हे कर्नाटकातील एक महान समाजसुधारक, वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक, कवी आणि समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी बाराव्या शतकात जातीभेद, अस्पृश्यता आणि स्त्री-पुरुष असमानतेविरुद्ध लढा देत, 'अनुभव मंटप' (पहिली संसद) स्थापन करून लोकशाही व सामाजिक समतेचा पाया रचला. बसवेश्वरांचा जन्म विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी येथे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी इ.स. ११०५ साली एका ब्राह्मण कुटुंबात झाला. वडिलांचे नाव मादीराज आणि आईचे नाव मादलांबिका होते लहानपणापासूनच त्यांनी उपनयन संस्कार नाकारून जातीभेदाचा विरोध केला. त्यांनी कूडलसंगम येथे शिक्षण घेतले आणि निराकार शिवभक्तीचा (लिंगायत धर्म) पुरस्कार केला. महात्मा बसवेश्वरांचे विचार आणि कार्य :सामाजिक समता: महात्मा बसवेश्वरांचे मुख्य विचार सामाजिक समतेवर आधारित आहेत. त्यांनी १२ व्या शतकात जातीभेद, अस्पृश्यता, आणि स्त्री-पुरुष असमानतेविरुद्ध लढा देत अनुभव मंटपाच्या माध्यमातून समतावादी समाजाची पायाभरणी करून लिंगायत धर्माद्वारे मानवी समानतेचा पुरस्कार केला.कायक वे कैलास: श्रम हीच पूजा काम करणे ही केवळ उपजीविकेचे साधन नसून ती ईश्वराची आराधना (पूजा) मानली पाहिजे.कायका प्रामाणिकपणे, निस्वार्थपणे आणि शारीरिक कष्ट करून केलेले कार्य म्हणजे 'कायक.कैलास कामात मग्न राहणे म्हणजे कैलास मिळवणे, म्हणजेच कामातूनच मोक्ष मिळतो. कामाची प्रतिष्ठा सर्व प्रकारच्या कामांना (शारीरिक व बौद्धिक) समान मान आणि प्रतिष्ठा दिली गेली पाहिजे, कोणताही व्यवसाय कनिष्ठ नसतो.लिंग समानता: स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक व आध्यात्मिक अधिकार मिळवून दिले. बसवेश्वरांनी स्त्री आणि पुरुष यांच्यात आत्मिकदृष्ट्या कोणताही भेदभाव मानला नाही. 'शिव' भक्तीमध्ये दोघेही समान आहेत, हा विचार त्यांनी रुजवला. १२ व्या शतकात स्थापन केलेल्या जगातील पहिल्या संसद 'अनुभव मंटप' मध्ये त्यांनी अक्का महादेवी, नीलाम्बिका यांसारख्या अनेक महिलांना स्थान देऊन त्यांना विचारांचे स्वातंत्र्य दिले. बसवेश्वरांनी स्वतःच्या पत्नीव्यतिरिक्त इतर सर्व स्त्रियांना माता किंवा बहीण म्हणून सन्मान देण्याची शिकवण दिली, ज्यामुळे समाजात स्त्रियांना आदराचे स्थान मिळाले. त्यांनी बालविवाह, सती प्रथा यांसारख्या स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या रूढींना कडाडून विरोध केला आणि पुर्नविवाहाला पाठिंबा दिला.अंधश्रद्धा निर्मूलन: बसवेश्वरांनी बाह्य पूजा, जत्रा, बळी प्रथा आणि अंधश्रद्धा पूर्णपणे नाकारल्या. त्यांनी "जुने जाऊ द्या मरणालागुनी" असे म्हणत जुन्या रुढी-परंपरा जाळून टाकण्याचे आवाहन केले. केवळ अंधभक्ती न करता, कार्यकारणभाव आणि अनुभवावर आधारित विचारांना त्यांनी महत्त्व दिले. अंधश्रद्धेपेक्षा नैतिक आचरण (सदाचार) श्रेष्ठ मानले. खोटे बोलू नका, हिंसा करू नका, चोरी करू नका, असे सांगून माणसाने स्वतःला शुद्ध करावे असे सांगितले.जगातील पहिली संसद : त्यांनी 'अनुभव मंटप' या जगातील पहिल्या संसद सदृश संस्थेची स्थापना करून, लिंग, जात आणि वर्णाचे भेदभाव मोडून काढले. अनुभव मंटपला जगातील पहिली संसद म्हणून ओळखले जाते, कारण येथे लोकशाहीची मूल्ये - जसे की मुक्त भाषण, समान प्रतिनिधित्व, आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया - प्रत्यक्षात आणली गेली होती, जी आजच्या संसदेसारखीच आहे.अनुभव मंटपमध्ये अक्का महादेवींसारख्या महिला संतांना पुरुषांच्या बरोबरीने वैचारिक व्यासपीठ देऊन त्यांनी स्त्री-सक्षमीकरणाचा पाया रचला. आंतरजातीय विवाह: बसवेश्वरांनी बाराव्या शतकात, शाहू-फुले-आंबेडकरांच्या खूप आधी, समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले.त्यांनी मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत आणि सवर्ण (ब्राह्मण) मंत्री मधुरस यांची कन्या कलावती यांचा विवाह लावून दिला. आंतरजातीय विवाह घडवून आणून तत्कालीन रूढीवादी समाजात मोठी क्रांती केली होती.लिंगायत धर्माची स्थापना: बसवेश्वरांनी वेदशास्त्र, यज्ञ, कर्मकांड, पशूबळी, आणि जातीव्यवस्थेला कडाडून विरोध केला . त्यांनी तत्कालीन सामाजिक शोषण थांबवण्यासाठी, शिव-शरण परंपरेचा पाया रचून 'लिंगायत' हा स्वतंत्र धर्म स्थापन केला. महात्मा बसवेश्वर हे केवळ धर्मगुरू नव्हते, तर ते क्रांतिकारक समाजसुधारक , होते म्हणून 'क्रांतिकारी' आणि ' समतेचे जनक' म्हटले जाते.त्यांनी १२ व्या शतकात लोकशाही, समता आणि श्रमाची प्रतिष्ठा या तत्त्वांवर आधारित समाज घडवला. त्यांचे हे विचार आजच्या तरुणांना व समाजाला दीपस्तंभ ठरणार आहेत. त्यांच्या विचाराची गरज आजही आहे. अशा या सिद्ध पुरुषास विनम्र अभिवादन.




**अभ्यासक सुयश सुभाष हुलपल्ले**

मुरूम, ता. उमरगा जि.धाराशिव

मोबाईल नं. 8788409795



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ एप्रिल २०२६

## छत्रपती संभाजीनगरात CSTE कोर्स पूर्ण करणाऱ्या शिक्षकांचा गौरव




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद (प्राथमिक शिक्षण विभाग) छत्रपती संभाजीनगर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), छत्रपती संभाजीनगर आणि लीडरशिप फॉर इक्विटी यांच्या संयुक्त विद्यमाने CSTE कोर्स राबविण्यात आला होता. या कोर्ससाठी जिल्ह्यातील 987 शिक्षकांनी नोंदणी केली असून, त्यापैकी 126 शिक्षकांनी कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला आहे, त्या सर्व शिक्षकांना अभिनंदन. कोर्स पूर्ण करणाऱ्या सर्व शिक्षकांना लवकरच प्रमाणपत्र ( सॉफ्ट कॉपी ) देण्यात येतील.

या कोर्समध्ये विहित मुदतीत तसेच मार्गदर्शनानुसार सर्व असाइनमेंट्स उत्कृष्टरीत्या पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना आम्ही बक्षीस व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करत असतो.

आपल्या कोर्सचा मुख्य उद्देश हा CS एज्युकेशन हा विषय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. त्यासाठी आपण सर्व शिक्षकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद अत्यंत कौतुकास्पद आहे. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद.

आम्ही पाहत आहोत की, आपण कोर्सच्या अनुषंगाने विविध उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे राबवत आहात. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकवला जाणारा कोडींग हा विषय आपल्या इच्छाशक्ती व प्रयत्नांच्या जोरावर आपण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. यामध्ये बक्षीस हा केवळ प्रेरणा देण्यासाठी दिला जाणारा एक घटक आहे.

यामध्ये यशस्वीरित्या कोर्स पूर्ण करणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठी असली, तरी बक्षिसांची संख्या मर्यादित असल्यामुळे रँकिंगनुसार पहिल्या २० शिक्षकांची निवड करण्यात आली होती. निवड झालेल्या सर्व शिक्षकांना बक्षीस म्हणून लॅपटॉप व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले या प्रसंगी प्रमुख अतीथी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर चे प्राचार्य डॉ.राजेंद्र कांबळे ,जिल्हा समन्वयक रविराज निंबाळकर , वरिष्ठ अधिव्याख्याता संजय येवते होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्निल बारहाते यांनी केले व एकून कोर्सचा आलेला अनुभव श्रीमती सरला कामे व सिराज पठाण यांनी व्यक्त केला

## टरबुजराव

टरबुजराव टरबुजराव
शेतात तुमचा गाव
उन्हाळा लागला की
आठवते तुमचे गाव

अगडबंब तुझं रूप
हिरवी जाड काया
लाल लाल गरात
काळ्या काळ्या बिया

उन्हाळ्याच्या दिवसात
तुझेच गुणगान गाती
उष्माघात होण्याची
मुळीच नसते भीती

सुरीने तुला कापून
आजी करते फोडी
लाल लाल गराला
न्यारीच असते गोडी

लाल गराचा ज्यूस
पितो हरपून भान
उन्हाळ्यात शरीराला
थंडावा देतोस छान



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## पाचर ठोकलेल्या दिवसात

या पाचर ठोकलेल्या दिवसात
जीव अडकलाय पेचात
प्रश्न आले गहिवरून
अन् उत्तरांच्या ओलावल्या कडा

या सुंदर उद्यानातील
फुलांचा रंगीबेरंगी बहर
सरलाय केव्हाच

वळवाचा पाऊस ही
थांबत नाही आता
युआष्याच्या माळरानावर क्षणभर

अस्तित्व होत चाललंय धूसर
सूर्य कासराभर वर असताना ही
उजेडाचं...

आता सूर्याला पडला प्रश्न
उजेड फितूर झाला की काय ?
मनाच्या गाभाऱ्यात
अवेळी काळोख दाटल्याने..

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

## जवळची माणसचं

आपलेच आपल्याशी,
विरोधात वागतात.
शत्रू गोटात जाऊन,
उणेदुणे सांगतात. १

रक्ताचीच नाती आता,
स्वार्थापोटी सोडतात.
शत्रू जवळ करून,
नाते सारे तोडतात. २

जवळची माणसचं,
सदा करतात घात.
इतिहास साक्ष आहे,
आपलेच देती मात. ३

नातीगोती संपवून,
शत्रूमागे पळतात.
जवळची माणसचं,
शत्रूकडे वळतात. ४

सत्य कळता संपले
नाते संघर्षात सारे
वाहू लागले सर्वत्र
सदा दु:खाचेच वारे. ५



**नागेश बोंतेवाड,**
छत्रपती संभाजीनगर

## जागतिक वारसा दिनानिमित्त बीबी का मकबरा येथे चित्रकला स्पर्धा उत्साहात; विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव




**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक वारसा दिनाचे (World Heritage Day) औचित्य साधून आज, १८ एप्रिल रोजी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या (ASI) वतीने ऐतिहासिक 'बीबी का मकबरा' परिसरात शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कुंचल्यातून ऐतिहासिक वारशाचे महत्त्व कागदावर उमटवले.*विजेत्यांची निवड*स्पर्धेत शहरातील विविध विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामधून उत्कृष्ट कलाकृती सादर करणाऱ्या खालील विद्यार्थ्यांची विजेते म्हणून निवड करण्यात आली: कनिष्का सलामपुरे अथर्व टोंगराज आरोही सलामपुरे अनन्या गायकवाड तनुश्री गहिरे *वारसा जतनाचे आवाहन*बक्षीस वितरण समारंभाप्रसंगी पुरातत्व विभागाचे अधीक्षक *डॉ. शिवकुमार भगत* यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "पुरातत्व विभाग वारसा संवर्धनासाठी सदैव पुढाकार घेत आहे. परंतु, आपल्या देशाचा हा मूर्त आणि अमूर्त वारसा जतन करणे ही केवळ विभागाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. तरुणांनी या वारशाचे मूल्य ओळखून त्याच्या रक्षणासाठी पुढे यावे."### *मान्यवरांची उपस्थिती आणि गौरव*विजेत्या विद्यार्थ्यांना व सहभागी स्पर्धकांना *डॉ. शिवकुमार भगत* (अधीक्षक, ASI), *नंदकुमार भोजपुरिया* (तंत्रज्ञ) आणि *संजय रोहणकर* (संरक्षण सहाय्यक) यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयातील शिक्षक नितीन भारती आणि मंगल सुलताने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रमाचा समारोप उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून करण्यात आला.ऐतिहासिक वास्तूच्या सानिध्यात पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वारसा स्थळांबद्दल विशेष ओढ निर्माण झाल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ एप्रिल २०२६

# सामाजिक क्रांतीचे अग्रदूत - महात्मा बसवेश्वर

**मं**गळवेढा राज्यात कळचूर्य वंशीय घराण्याचे राज्य होते. हे कळचूर्य कल्याणच्या चालुक्य घराण्याचे मांडलिक राजे होते. कळचूर्यांनी ' इंगळेश्वर बागेवाडी ' विभागाचे ' पुरवराधिश्वर ' पद बागेवाडी ( जि.विजापूर ) मादिराजांना बहाल केले होते पुरवराधिश्वर हा पंचक्रोशीतील बारा गावचा प्रमुख असे. ' मादिराज - मादलांबिका ' पती-पत्नीस ज्येष्ठ पुत्र ' देवराज ' व जेष्ठ कन्या ' नागलांबिका ' होती. पुरावराधिश्वर मादिराज धार्मिक, सात्विक व सद्वर्तनी असे शैव ब्राह्मण होते. बागेवाडी ऐक प्राचीन नंदिकेश्वर शिवमंदिर आहे. प्रवेशद्वारावर गजलक्ष्मी, आठ दिशांचे दिक्पाल, छतावर मधोमध कोरलेली नटराजाची मूर्ती अशा कलात्मक शिल्पसौंदर्याने श्रृंगारलेल्या शिवालयाच्या गाभाऱ्यात मोठे शिवलिंग आहे. शिवलींगासमोरचा भव्य नंदी पाहणाऱ्यांच्या मनात भक्तिभाव निर्माण न करील तरच नवल. बागेवाडीच्या जीवनात असाच एक शुभ दिवस उगवला इ.स ११०५ मधील वैशाख शुद्ध तृतीया, रोहिणी नक्षत्रावर अक्षय तृतीयेच्या शुभ दिवशी मादलांबिकेला दुसऱ्यांदा पुत्ररत्न झाले.बागेवाडी आनंदात निमग्न झाली. नंदीचा कृपाप्रसाद म्हणून मुलाचे नाव ' बसव ' असे ठेवण्यात आले. हाच 'बसव ' किंवा ' संगन बसव ' पुढे समता युगाचा दृष्टा प्रारंभकर्ता महात्मा बसवेश्वर म्हणून जगापुढे आला. महात्मा बसवेश्वरांच्या जन्मापूर्वी या देशात लोकायत, महावीर व गौतम बुद्ध सारख्या महात्म्यांनी मनुष्यांना कर्माच्या बंधनात अडकून टाकलेल्याना त्यांचे शोषण करणाऱ्यांना शिवाय जन्माधिष्ठित श्रेष्ठत्वाचा कल्पनेस नाकारले. शुद्र अतिशूद्र आधी सर्वांना सर्व रीतीने समानतेने जगण्यासारखे समाजाची कल्पना दिली मात्र बसवेश्वरांनी याची साधना करण्याचा व साध्य करण्याचा मार्ग दाखवून दिला. शिवाय तो आचरणात आणून दाखविला. महात्मा बसेश्वरांचा देव अंतःसाक्षी आहे. अशा देवाला जाणण्यापूर्वी मूर्ती रूपातील देव हा बसवण्णाचा देव नव्हता. त्या अंतःसाक्षीलाच इष्टलिंग रूपात पाहिले आणि म्हणून इष्टलिंग हे अंतःसाक्षीचे संकेत (प्रतिक) झाले त्या अंतःसाक्षीच्या समोर सारे जगच एक होऊन राहते म्हणूनच सकल जीवमात्रांनी भरलेल्या जंगम जगतालाच अर्थात सकल जीवात्म्यांचा समूहाला देव समजले अशा रीतीने अंतःसाक्षी देव आणि समाज हे त्यांनी वेगवेगळे कधीच पाहिले नाहीत या कारणामुळेच बसवण्णांना लोकात, समाजात देवाचा साक्षात्कार झाला.' स्वयं लिंगाअनुभवी झाल्यानंतर कोठला देवलोक, कोठला मृत्युलोक ? कोठला भेदभाव, कशात भेदभाव हो ? आलस्य कोठे, कुडलसंगम देवा जवळ ? ( म. बसवेश्वर वचन क्र ९४७ संपुट -१)

बसवेश्वरांना जेव्हा अंतरंगातील देवाचा साक्षात्कार झाला. तेव्हा त्यांना सर्वत्र अभेद दिसू लागले. भेदाभेद भ्रम अमंगळ वाटू लागले. यात तारतम्य ( भेदभाव ) करण्याचे ज्ञान तृणसमान असल्याची जाणीव होऊ लागली. त्यांनी हे सत्य जगाला सांगण्यासाठी जे श्रम घेतले, त्यात त्यांना अजिबात कंटाळा व थकवा आला नाही.समाज आणि देव ( परशिव) हा गंडभेरुड पक्षाप्रमाणे दोन शिरा आणि एक शरीर असल्यासारखे आहे. शिर वेगवेगळे असले तरी देह एकच असतो - ' भेरुंड पक्षाला देह एक, डोळे दोन दोन डोक्यामध्ये पडला बांधून एका डोक्यामध्ये दूध, एका डोक्यामध्ये विष ओतल्यास त्या एका देहात सोडणार नाही का विष ? लिंगाची पूजा करून, जंगमाची निंदा केल्यास कुडलसंगम देवा पहा, मी होरपळून गेलो खास. ( म.बसवेश्वर वचन क्रं १२९९ संपुट - १ )

बसवेश्वरांना इष्टलिंग हे परिपूर्ण समाजाचे प्रतीक असल्याचे दिसते. अशा प्रतीकाला हे ' शरणार्थी ' असे म्हणून अभिवादन करतात. त्या प्रतीकानुसार त्या प्रत्येकाला शोभेल असे समाजाभिमुख आचरण असायलाच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि स्त्री-पुरुषांच्या मध्ये समानता साधल्याशिवाय कल्याण समाजाची स्थापना करणे असंभव आहे. अशी समानता साधण्यासाठी समाजाला वर्ग रहित, वर्ण रहित आणि लिंगभेद रहित ( स्त्री-पुरुष भेदरहित ) झाले पाहिजे. अशा रीतीने समता समाजासाठी बसवण्णांनी आपले तन-मन-धन अर्पण केले. अमानवीय असलेल्या सर्व बाबीवर प्रश्न उपस्थित केले. सर्व दृष्टीने शेवटच्या वर्णातील मनुष्य म्हणून घेणाऱ्यांना मनुधर्मानुसार निर्मित अस्पृश्यतेच्या व सहाय्यकारी कुंडात खितपत पडलेल्यांना पाहून बसवण्णा अतित्रासून दुःखी कष्टी झाले. स्वतः मागास जातीकरणाचा अवलंब करून एक नवीन मनस्थितीतच मिळविली. अस्पृश्यता प्राप्त जाती ही केवळ जाती नसून त्यामागे सर्वांकरिता हेतुपुरस्पर उत्पादन व्यवस्था असते.अस्पृश्यांच्या विरोधात शोषण व्यवस्था असते. शिवाय त्यात अनादर आहे, अपमान आहे , हिंसा आहे , दुःख आहे , योग्य प्रतिफळ नसलेले कष्ट आहे, असहाय्यता आहे , भूक आहे सवर्णांचे हे सारे कर्मकांड पाहून बसवेश्वर जातीकूपामध्ये खितपत पडलेल्या अखेरच्या मनुष्य पर्यंत धावून गेले आणि त्यांना खांद्यावर बसविले आणि वर काढले. महात्मा बसवेश्वर अस्पृश्यांच्या बाजुने नुसते उभे टाकले नाही तर अनैतिक संबंधातून जन्मुन समाजात अतिकनिष्ठ होऊन जगत असलेल्या बाळांच्या वतीने अभय देण्यासाठी ढाल होऊन राहिले. महात्मा बसवेश्वर किती संवेदनशील होते हे कुडलसंगम देवाला साक्षी बनवून स्वतः अनाथ बाळ झाले. ' मातंग चन्नय्यांच्या घरचा दासपुत्र, ढोर कक्कयाच्या घरची दासीकन्या, गेले होते शेतात गोवऱ्या वेचण्या, त्या दोघांनी तेथे संग केला त्या दोघांच्या पोटी माझा जन्म झाला कुडलसंगमदेव यास साक्षी । ( म.बसवेश्वर वचन क्रं ३४६ संपुट - १ )

मनू हा जातिसंकराचा विरोधक होता. मात्र जातिसंकरच बसवधर्माचा प्राण झाला होता. नैतिक शक्तीपुढे जात-पात ही किती फोल आहे हे बसवेश्वरांनी आपल्या ह्यातीत दाखवून दिले. यावरून असे दिसून येते की बाराव्या शतकात कल्याण नगरीत बसवेश्वरांनी पेटवलेली क्रांतीची ज्योत कधीही शमणार नाही. याची या जगाला जाणीव होऊ लागली आहे.' हत्या करणारा मातंग ,अभक्ष भक्षण करणाराच महार, कुळ म्हणजे काय ? त्यांचे कुळ असे कोणते ? सकल जीवात्म्याचे कल्याणा चिंतितात असे आमच्या कुडलसंगमदेवाचे शरणगणना कुलीन होत । ( म.बसवेश्वर वचन क्रं ५९१ संपुट - १ )

येथे ' हत्या करणारा ' आणि ' घाण करणारा ' हे शब्द यज्ञासंबंधी आहेत. यज्ञ करणारे, यज्ञात बळी देणारे आणि कायक न करणारे, घाण खाण्यामध्ये, धार्मिक भ्रष्टाचार करण्यामध्ये तल्लीन झाले आहेत, असे बसवेश्वर सुचवितात. जिवाचा बळी घेणाऱ्यांना आणि यज्ञ संस्कृतीला विरोध करणारे शरणगण सकल जीवात्म्याचे कल्याण साधण्याची अपेक्षा ठेवणारे होत असे सांगणारे बसवेश्वर त्यांचा पर्याय सुचवतात कायक व्यवस्थेची कल्पना रुजवितात. भौतिक आणि अध्यात्मिक पृष्ठभूमीतील या व्यवस्थेमध्ये मागणारा भक्त नव्हे ! बसवेश्वरांनी आम्हास दिलेली ही देणगी आहे अशा समाजासाठी आज विश्व उत्सुक आहे. समाजात आढळणाऱ्या कर्मकांडांना अनेक देवता उपासना कारणीभूत वाटल्यावरून बसवेश्वरांनी एकदेवतोपासनेचा हिरिरीने पुरस्कार केला. शिवस्वरूप विश्वाची प्रतिकृती आणि मनाने इच्छिलेले इष्ट ते देणाऱ्या इस्टलिंगाची भक्ती करावी. लहान आकाराचे इष्टलिंग प्रत्येक स्त्री पुरुषाने आपल्या अंगावर धारण करावे म्हणजे मग केव्हाही, कोठेही सुलभ शिवभक्ती करता येऊ शकते. मग देऊळे-रावळे, तीर्थक्षेत्रे इत्यादी ठिकाणी जाण्याची अजिबात गरज नाही. अशीही इष्टलिंग दीक्षा कोणालाही घेता येईल. स्त्री असो वा पुरूष, चारही वर्णातील सर्व जातीतील गरीब-श्रीमंत राजा-रंक त्यासाठी पात्र आहेत अशा लिंगधारी व्यक्तीची पूर्वाश्रमीची जात नष्ट होईल आणि सर्वजण लिंगायत होतील मग त्यांच्यात उच्च-नीच, गरीब-श्रीमंत ,शिक्षित - अडाणी असा कोणताही भेदभाव उरणार नाही त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार ही होऊ शकतील. संस्कृत भाषेतील ज्ञान सर्व जाती वर्णांना शोषित पीडितांना कळत नाही म्हणून देववाणी संस्कृत ऐवजी आपल्या बोलीभाषेत लोकभाषेत बोलावे व लिहावे स्त्रिया व शूद्रांना ही विद्यादान करावे कारण सर्व जाती वर्णातील सर्वच व्यवसायातील लोकांना स्वतःचा उद्धार करून घेण्याचा अधिकार आहे ते तसे पात्र आहेत बाराव्या शतकात असा क्रांतिकारक नवधर्म संदेश महात्मा बसवेश्वरांनी दिला आहे. महात्मा बसवेश्वरांनी समूह चर्चेतून अनेक चांगल्या गोष्टी स्वीकारल्या इष्टलिंग उपासकांना बसवेश्वरांनी जीविकोपार्जनाचे काम करणे आवश्यक केले. संन्यास, निष्क्रियता, ऐतखाऊपणा, भिक्षा मागणे पाप ठरविले. कायक संकल्पना जगातील यापूर्वीच्या एकाही धर्म पंथात सांगितलेली नव्हती यापुढे जाऊन ' स्वर्ग-नरक' ही पारंपरिक कल्पना ही त्यांनी नाकारली. पुनर्जन्माचा व कर्मविपाकाचा सिद्धांतही नाकारला. आपण राहतो जगतो ते जग खोटे मांनले नाही ते म्हणत ' या जगातच चांगली कर्मे केल्याने स्वर्गासम सुखे प्राप्त होऊ शकतात. तर वाईट कृत्याने पृथ्वीवरच नरकासम यातना भोगाव्या लागतात. त्यांनी स्पृश्य-अस्पृश्यता, कठोर ब्रह्मचर्य पाळणे, वानप्रस्थाश्रम स्वीकारणे, इंद्रियनिग्रह हिंसा इत्यादी प्रकारांचा निषेध केला. महात्मा बसवेश्वर आस्तिक व श्रद्धाळू होते मानवतेवर व माणुसकीवर त्यांची अतूट श्रद्धा होती. म्हणून दया, करूणा, परोपकार यासारख्या जीवनमूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला. वेश्या, दारू विक्रेते, चोर, दरोडेखोर यासारख्या सामाजिक गुन्हेगारांना अत्यंत उदार मनाने क्षमा करून त्यांना सज्जनांच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. आपल्या देहालाच देवालय करा. असा संदेश महात्मा बसवेश्वरांनी समाज बांधवांना दिला होता. देहालय हेच खरे पवित्र देवालय होय अशी महात्मा बसवेश्वर यांची आंतरिक श्रद्धा होती संत तुकोबारायांच्या ' देह हेच देऊळ आत्मा पंढरीनाथ ' या विचाराशी साधर्म्य साधणारे महात्मा बसवेश्वर यांचे हे मौलिक विचार आहेत. बसवण्णांने अंधश्रद्धेचा तिरस्कार केला आहे त्यांनी आपल्या शिष्यांना अंधश्रद्धांचा त्याग करण्यास सांगितले शुभकार्यासाठी ज्योतिषाकडून मुहूर्त पाहण्याची लिंगायताला गरज नाही असा बसवाचा दृष्टिकोन होता बसवेश्वरांनी अस्पृश्यांची अभिनव व्याख्या केली आहे ती अशी - ' हत्या करणारा नीच म्हणावाकुंजके मांस खाणारा कनिष्ठ जातीचा म्हणावा सर्व जीवसृष्टीवर प्रेम करतो तोच उत्तम जन्माचा म्हणावा ।' बसवाने संत एकनाथाप्रमाणे वर्णाश्रम धर्माच्या विरुद्ध आचरण करून महाराच्या घरी जाण्याचे धाडस दाखविले यातून त्याचा परिवर्तनवादी दृष्टिकोन दिसून येतो. ' कायक वै कैलास ', ' श्रम हाच स्वर्ग ' हे महात्मा बसवेश्वर यांचे प्रसिद्ध वचन आहे कायक चा शब्दशः अर्थ देहाशी निगडीत ते ते सर्व असा होतो. काया म्हणजे देह किंवा शरीर अंगमेहनत किंवा व्यक्तीने केलेले कुठलेही कार्य असा त्याचा अर्थ होतो बसवा च्या मते प्रत्येक व्यक्तीने आपला चरितार्थ चालविण्यासाठी कोणतातरी व्यवसाय केला पाहिजे. प्रमाणिकपणे कार्यरत असणे, या गोष्टीला त्यांनी अत्यंत महत्त्व दिले आहे. महात्मा बसवेश्वर व त्यांच्या अनुयायांचे विचार ' Works is Worship ' या विचारसरणीशी तंतोतंत जुळणारे वाटतात. राजाराम मोहनरॉय, महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी जी स्वप्ने एकोणिसाव्या व विसाव्या शतकात पाहीली ती महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात आमलात आणली होती. महात्मा बसवेश्वरांनी केलेल्या सामाजिक सुधारणा क्रांतिकारक स्वरूपाच्या होत्या. त्याने पुरस्कृत केलेली आदर्श तत्वे प्रत्यक्ष व्यवहारात व आचरणात आलेली होती. सर्वसामान्य लोकांना त्यांची शिकवण समजली होती आणि त्यामुळेच असंख्य लोक त्यांचे अनुयायी झाले होते.भारताच्या इतिहासात बाराव्या शतकातील एवढ्या मोठ्या स्वरूपाची धार्मिक आणि सामाजिक चळवळ म्हणून लक्षात घेतली जाते एवढ्या मोठ्या सामाजिक व धार्मिक क्रांतीचा प्रणेता असलेला महात्मा बसेश्वर हा अदितीय नम्रता भाव असलेला माणूस होता म्हणून तो एका वचनात म्हणतो की,' माझ्याहून नीच नाही कुणी ही शिवभक्त हुन श्रेष्ठ नाही कुणी ही तुझे चरण पहा हे कुडल संगमेश्वराहीच माझी परीक्षा होय! ' जातीभेदाचे उच्चाटन, अस्पृश्यता निर्मूलन , स्त्री पुरुष समानता या साऱ्या चळवळीचे श्रेय बसवण्णाकडेच जाते हे मान्य करावे लागेल. बाराव्या शतकात बसवाने भक्ती मार्गाची शिकवण जनतेला दिली जे कार्य महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांनी केले तेच कार्य महात्मा बसवेश्वरांनी कर्नाटकात केले आहे. सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अखंड चालू असते. तिचा प्रवाह कधी संथ गतीने तर कधी द्रुत गतीने नेहमीच पुढे पुढे सरकत असतो. परिवर्तनाच्या प्रक्रियेत प्रवाह लुप्त झाल्या सारखा वाटत असला तरी तो नष्ट होत नाही. पण त्यासाठी महात्मा बसवण्णासारखे दूरदर्शी, कर्तव्यनिष्ठ प्रयत्नवादी आणि विवेकी नेत्यांची साथ लाभावी लागते. तरच झालेल्या परिवर्तनाच्या फलश्रुतीची चव सर्वांना चाखायला मिळते. मध्ययुग आणि आधुनिक युगातील सामाजिक प्रबोधनाचे कार्य आणि त्यांच्या स्वरूपात अगदी भिन्नता जाणवते बसवण्णांचा जीवन विषयक दृष्टिकोन आणि आधुनिक काळातील सामाजिक प्रबोधन कार्याचा दृष्टिकोन यात गुणात्मक फरक आहे वैज्ञानिक युगाचा शोध लावण्यापूर्वी बसवनण्णानी धर्म, जात, कुटुंब, विवाह, राज्य इ. सामाजिक संस्था कशा उदयास येतात. कोणत्या परिस्थितीत त्या प्रभाव पडतात आणि त्यांचा ऱ्हास कसा होतो याचे शास्त्रीय विश्लेषण वचन साहित्यातून केले आहे. महात्मा बसवेश्वर हे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. समाजातील कुप्रथेचे त्यांनी समोर नाश केलेला आहे. समाजातील कुप्रथा म्हणजे जाती पद्धतीमुळे होणारा भेदभाव आक्रमक समाज व संग्रह प्रवृत्ती इ. संपविण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. महात्मा बसवेश्वरांनी अंत्यजाच्या उद्धाराकरिता त्यांनी आपले जीवन वेचले. समाजामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी इष्टलिंग निर्माण केले. इष्टलिंग धारण केल्याने व्यक्तीची पूर्व जाती नष्ट होऊन तो शिवकालीन होतो. बसवेश्वरांनी वचनातून सांगितले आहे की, शास्त्रे, पुराणे, गीता, वेद, उपनिषद यामध्ये उदात्त तत्त्वांचा उपदेश दिला गेला आहे. पण विप्रांचा मार्ग, त्यांचे बोलणे- वागणे ह्यामध्ये एकरुपता नाही. यज्ञाच्या नावावर गोमांस भक्षण करणारे अस्पृश्य होत. व्यास भोईनीचा पुत्र, मातंगीचा पुत्र- मार्कंडेय, मंडूकाची कन्या मंडोदरी, अगस्त-बेरड, दुर्वास-चांभार, कश्यप-लोहार कौण्डिन्य ऋषी- न्हावी अशा प्रसिद्ध ऋषीमुनींचा जन्म निम्न कुळात झालेला असताना देखील आपल्या विद्वत्तेने, ज्ञानाने, योग्यतेने ते प्रसिद्ध झाले. म्हणून जन्माने कुणी श्रेष्ठ नसतो, आपल्या कर्तव्याने, तपस्येने साधनेने व्यक्ती जो महान बनतो तोच कुलीन होय असे त्यांचे मत होते. महात्मा बसवेश्वर क्रांतिकारक होते, अचानकपणे झालेला बदल म्हणजे क्रांती असा सामान्यतः क्रांतीचा अर्थ घेतला जातो. परंतु हा क्रांती चा अर्थ संकुचित व अपूर्ण आहे. सामाजिक जीवन ज्या मूल्य व्यवस्थेवर उभे असते, त्या मूल्यव्यवस्थेत बदल करणे म्हणजे क्रांती होय. याचा अर्थ मूल्यांतर म्हणजे क्रांती. मूल्यांतर म्हणजे व्यक्ती आणि समाजाच्या वैचारिक दृष्टिकोनात व कलामध्ये बदल घडवून आणणे होय. महात्मा बसवेश्वरांनी व्यक्ती व समाजाच्या वैचारिक दृष्टिकोनात बदल घडून आणण्यासाठी अथक प्रयत्न केले म्हणून ते खरे क्रांतिकारक होते. भारतीय तत्वज्ञानात इहजीवनाचा आणि श्रमाचा इतका गौरव महात्मा बसवेश्वरांनी प्रथमच केला. संन्यासवादाला लाभलेली प्रतिष्ठा त्यांनी काढून घेतली. हे त्यांच्या तत्त्वद्रष्टीचे एक लक्षणीय अंग आहे. पारलौकिकाचे स्तोम माजलेल्या निवृत्तीप्रधान समाजात नवनिर्मितीचे कार्य होऊ शकत नाही. समाजजीवन क्रियाशील बनावे यासाठी ऐहिक जीवनाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. नाही तर सामाजिक शक्ती उत्तरोत्तर क्षीन होत जातात असा इतिहास आहे. बसवेश्वरांनी कर्मवादी वीरप्रवृत्तीची चेतना समाजजीवनात ओतली आणि पुरुषार्थाचा ध्वज त्यांनी फडकविला. निढळाचा घाम काढणारा माणूस सामाजिक जीवनात त्यांनी प्रतिष्ठेने उभा केला. हे त्यांचे कार्य व सामान्य स्वरूपाचे आहे. संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रमामुळे या देशाच्या अर्ध्या लोकसंख्येची श्रमशक्ती निष्क्रिय व कुंठित झाली ही समाजाची व देशाची हानी होय. महात्मा बसवेश्वरांच्या पूर्वीच्या काळात भूमिप्रदेश जिंकण्यासाठी स्त्रियांसाठी जगात अनेक लढाया व क्रांत्या झालेल्या होत्या यातूनच रामायण व महाभारत ही घडले, परंतु मानवतेच्या कळवळ्यापोटी मंदिर प्रवेश नसणाऱ्या अठरापगड देवपुत्रांच्या, शूद्रअस्पृश्य स्त्री-पुरुषांच्या तळहातावर समताप्रतीक इष्ठलिंग ठेविले गोरगरिबांचे भुकेसाठी हाल होऊ नये यासाठीच ' कायकत्व ' सांगितले म्हणूनच झाली कल्याण क्रांती. समाजाची उंची व संस्कृतीचे श्रेष्ठपण व्यक्तीच्या सदाचरणावरच अवलंबून असते. आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी जशी व्यक्तीची आत्मशुद्धी महत्त्वाची तसाच बाह्य आचारही महत्त्वाचा आहे. आकाशात स्वर्गाची अशी वेगळी वसाहत नाही. पृथ्वी खाली पातळही नाही. जेथे माणुसकी, दया, क्षमा, शांती, समता, सत्य, करुणा, प्रेम, चारित्र्य व सौजन्य असेल तोच सदाचार होय तेथेच साक्षात स्वर्ग ! बसवण्णा म्हणतात, ' सत्य बोलणे हाच देवलोक असत्य बोलणे हाच मृत्युलोक आचारच स्वर्ग ! अनाचारच असे नरकसदैव करावी सज्जन संगती ।नको नको संगती दुर्जनांची असो सर्प कोणताही, विष त्याचे एक । म्हणूनिया देख संग नको ।।समता, सन्मती, सद्गुणांचे आचरण करा. रज, तम, क्रोध, यापासून मुक्त झाल्यावरच खरा अनुभव अनुभूती येईल. देवळांची निर्मिती, व्यवस्थापन, यज्ञाचे आयोजन या विषयावर पुराणग्रंथ आहेत. परंतु बळी देऊ नका, जादूटोणा, भूत योनी, सतीप्रथा, जारण मारण विद्या. मंत्र-तंत्र, अघोरी विद्या या अंधश्रद्ध विचाराचे खंडन कोणताही पुराणग्रंथ करीत नाही. महत्त्वाची बाब म्हणजे शुद्र, अतिशूद्र, बारा बलुतेदार, शेतकरी आणि स्त्रिया यांना मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश नव्हता या पार्श्वभूमीवर महात्मा बसवेश्वर म्हणतात, ' सधन बांधिती गोपुरे मंदिरे ।देवा ! मी गरीब करू काय ? देहाची असे देवालय । ' महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाचा सभामंटप व गाभारा अतिविशाल व अनंत केला पृथ्वीवरील मानव जात त्यात अंतर्भूत होऊ शकेल एवढा अनुभवमंटप आकाश मंटपाएवढा झाला. संस्कृत ऐवजी जनसामान्यांच्या लोकभाषेचा पुरस्कार व स्त्रियांना स्त्रीलिंग दीक्षा देऊन समतेची वागणूक देणारा परस्परांत रोटी-बेटी व्यवहार यांचे नातेसंबंध प्रारंभ करणारा महामानव म्हणजे महात्मा बसवेश्वर. पाप-पुण्याच्या, स्वर्ग-नरकाच्या अर्थशून्य भाकडकथा, कर्मसंन्यास सिद्धांत नाकारणारा बंडखोर क्रांतिकारक म्हणजे महात्मा बसवेश्वर. स्त्रियांना साक्षर करून उजेडाची नक्षत्र फुले देणारा, मुक्तीचे पंख देणारा मुक्तिदाता, विवेकवादी विश्वविभूती म्हणजे महात्मा बसवेश्वर ! शोषणमुक्त समाजाची निर्मिती करणारा, सामाजिक बांधिलकी स्वीकारणारा आणि उपेक्षित व्याकूळ शुद्रांना हृदयाशी कवटाळणारा, सर्वांचा लाडका करुणासागर अण्णा म्हणजे महात्मा बसवेश्वर होत. आज नऊशे वर्षानंतरही कोट्यावधी लोकांच्या अंतर्यामीच्या गाभाऱ्यात महात्मा बसवेश्वर यांची कोरीव मूर्ती अजरामर होऊन राहिली आहे आक्रमकांच्या टापांखाली ती चिरडली गेली नाही. भूकंपाने उद्ध्वस्त झाली नाही की धर्मांतराच्या पुरात वाहून गेली नाही. काळ प्रवाहात कित्येक राजे-महाराजे सम्राट राज्यकर्ते आलेत,गेलेत. परंतु काळ ही महात्मा बसवेश्वरांना संपवू शकला नाही. आज एकविसाव्या शतकातही महात्मा बसवेश्वर यांचे इष्टलिंग स्त्री-पुरुषांच्या मर्मबंधात समतेचा संदेश देत डौलत डुलत आहे. लोकनायक जयप्रकाश नारायण म्हणाले होते, ' वर्णभेद, वर्गभेद, उच्चनीच भेद, स्पृश्यास्पृश्य भेद या विरुद्ध सर्वप्रथम झगडणारे महात्मा बसवेश्वर हे आद्य समाजसुधारक होत. कर्मठ, सनातनी व उच्चप्रभू लोकांच्या स्वार्थी दडपणाला पहिला टोला मारलेले बसवेश्वर हे थोर समाजक्रांतिकारक होते. बाराव्या शतकातील धार्मिक-सामाजिक क्रांतीला आपण खऱ्या अर्थाने बसवाची क्रांतिकारी चळवळ म्हणून ओळखतो. कारण या ऐतिहासिक चळवळीचा बसवेश्वर एक सर्वमान्य नेता होता. काळाच्या मर्यादा झुगारून महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकातील सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक चळवळीचे नेतृत्व केले आहे .म्हणूनच काळाच्या भाळावरती उमटलेली 'बंडखोर समाजसुधारक ' ही बसवेश्वरांची प्रतीमा कोणालाही पुसून टाकता येणार नाही.


**डॉ. नारायण शिवशेट्टे**
पानसरे महाविद्यालय अजोपूर
ता.बिलोली जि. नांदेड.
मो.नं.९४२२५५८५७३

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ एप्रिल २०२६


# संध्यास्त इंद्रधनू : संध्यामग्न विरक्तीची वृतस्थ कविता




**क**वि गोविंद वायाळ मु.पो.वायाळ पांगरी बु.ता मंठा. जि.जालना.पुणे स्थित."नियतीनं अवेळीच हंगाम खुडून नेला की उरते केवळ जगण्याची उनगवाडी अन् दु:ख गर्भाशीण होतं.मग,फक्त दिवस जातात.दिवस सरत ही नाही आणि भरतही नाही"(पृष्ठ ७३)ही ओळ मनपिळवटूनटाकते.तिथं खरी कविता जन्म घेते.कवी शब्द श्वासा गणिक कविता होऊन जगतो.त्याचं नितळ मनफुलपाखरूहोऊन उडत राहतं आठवांच्या फांदीवर.शब्द थव्यांच्या कविता होऊन जातात.क्षणोक्षणी वैरानं माळरानी.कवी उदास होऊन डोळयांच्या कडा ओलावत लावितं राहतो मनाच्या तेलवाती.कवितेची अर्पणपत्रिका "संध्या,तू खानदानी जन्मजात निर्मोही..तरी,वृंदावनीच्या तुळशी मंजिरींचा सुंगध गेलीस सोबत घेऊन 'जप'म्हणून माझ्या तळहाती सांजवातीचा तेलदिवा ठेवून..! गुरुवर्यांचा चरणस्पर्श घेत हा शब्द घनव्याकुळ होऊन अर्पण करतो.'संध्यास्त इंद्रधनू',गुरुच्या चरणी.उराशी कवटाळून गहिवरल्या भावनेनं गळाभेट घेतं गुरू आशीर्वाद देतात.आई बाबांच्या चरणी नतमस्तक होतं.पुण्याईने दुर्दम्य इच्छाशक्तीने चांगला माणूस झाल्याची ग्वाही अन् आई बापाचं स्वप्न श्रीमंत करतो.हा अद्वैत अदम्य् इच्छेचा निर्लेप नितळ श्रध्देय रूप कवीचे दिसून येते.कवी गोविंद वायाळ हे एक निस्सीम श्रद्धेय ज्ञानभक्तीचे प्रतिक आहेत.आम्हीकवितेचं देणं लागतो.या नितळ भावनेतून रक्तवाहिनीचीकविता होऊन होऊन जगणं म्हणजे काय असते?श्रध्देय गुरू प्रा.जयराम खेडकर कवितेचा मर्मग्राही आस्वादक स्वानंद कवितेविषयी लिहितात"नुसती शब्दांची श्रृंखला नसते कविता,ओले काळीज जाळणारी ती आग असते."काट्यांची कुरूप होऊन दु:ख देहभर सलते तेव्हा खरी कविता येते.कविता असते आत्म्याचा शब्द,संचित जीवनाअनुभवाच्या दु:खाचा घनव्याकुळ उद्गगार असते कविता.सर्वात चांगली कविता लिहिणारा कवी त्या क्षणी सर्वात चांगला माणूस असतो.केवळ शब्द आणि अर्थ याची कविता होत नाही,तर ती असते सर्वांग सुंदर स्वप्न, सर्वांत चांगल्या माणसाच्या इच्छाशक्तीचं!..या श्रृखलेत गोविंद वायाळ यांचं अढळ स्थान आहे.संत तुकोबांच्या भूमिकांत वंशपरंपरेचा कवि म्हणून वाचक रसिकांना नोंद घ्यावी लागेल, कारण अनुभवांचा शब्दोच्चार म्हणून ही. कविता प्रकट होते(शुभेच्छापर)ही संध्यामग्न पुरुषांची लक्षणे.सृजनशील स्नेहाळू भावनेचा ओलावा या काव्यातून दिसून येतो.रानशिवारातला एक अनामिक नितळ निर्झर वाहत राहावा इतक्या तरलतेने ही कविता संध्यामग्न होऊन वाहते आहे.कवि अंत:करण इतके आर्त झाले आहे की, कवितेची सृजन ओळ खोलवर ओल देऊन जाते.जसे"स्वप्नात तिच्या आला,एक शब्दवेडा सांगत राहिला तिला रंग दिवान्या कहाण्या/सकाळी तिच्या भोवती होता चंद्रचुरा सांडलेला (पृष्ठ ०१)ही अलवार कोवळी मनमुग्ध मनाची ओळ कविच्या मनाची अंभगीत लयताल आहे.पुढे चिंब पावसात भिजताना, माझ्या स्पर्शातील किरण,मी माझा असतो तेव्हा तुझाचं असतो,शिरस्त्याचे बंध झुगारून, स्वप्नातील ओल काळीजभर होते, स्पर्श व्हावा असा की,या कवितेमधून एक निस्सीम सृजनशील भावकविता आपल्या सखीच्या पैंजणी ध्वनीची एक लय घेऊन येते.देहाच्या अंतरगी सखीला आपल्या मनाच गोडगुलाबी गुपीत मनाच्या कुपीत आतरदानी गत जपावं इतकं निष्ठावंत भूमीनिष्ठ भाग्यवंत होऊन ही कविता संयत तरलतेने येते.जसे "स्पर्श व्हावा असा की, निखळून पडावे बंध सारे पापुद्रे निघावेत काळजाचे उकलत जावे सारे पदर अन् उन्मळून पडावे मुळासकट कुण्या गंधार्त स्मृतीत"....(पृष्ठ ०७) काव्य हे मनातून खोलवर झिरपत राहते.तिच्या आठवणीचा नितळ झरा वाहत राहतो.कवि मन एक नितांत निवांत मनातून अशांत पाखरू होऊन फक्त ध्यानमग्न अवस्थेत एखाद्या ओढ्याच्या काठावर फक्त तिच्या अमोघ वाणीचा एखादा स्वर कानावर येईल.तीने तिचं अहेव लेणं मिळवलं.तो एक अनामिक ओढीनं फक्त तिची वाट पाहतो आहे.तिने सारं सर्वस्व अर्पण केलं.ती आहुती म्हणून त्याच्या चरणाशी लिनं झाली.तो तिच्या मोहात अजूनही फक्त सुगंध होऊन तिच्या चाहुलीनं तो चावळला आहे.हा साक्षात परमानंद मनाचा हुंकार देत तिच्या मोहाची कविता होऊन जगतो आहे."निळ्या नवलाईतील नितळ लेणं, दु:ख वाटून घेता येतं, राजबिंड्या वैभवाला बिलगली हिरवाई,राजवर्खी रूपाला नक्षत्राचा जर,रंग उधळले असे तू फुललो,बहरलो,मोहरलो, तुझ्या निर्देही असण्यातील रंग"ही कविता इतकी तलम रेशमी बंधाची आहे.वाऱ्यावरती हळूवार स्पर्शून सारी स्वप्न फुले आभाळभर व्हावीत अन् या आभाळरंगात युगानुयुगाचा प्रेमानूबंधाचा ढगांनी सप्तरंग काढावेत इंद्रधनूचे इतकी अनामिक ओढीची ही प्रेमळ कविता जसे"तुझ्या निर्देही असण्यातील रंग माझ्या सदेही/जगण्यात उतरले असे की, इंद्रधनू उमटले अस्मानी माझ्या..(पृष्ठ १३)कवीवर्य गोविंद वायाळ जी यांच्या शब्दकळेने एक आर्त हाक जी केवळ कवितेचा मर्मग्राही अनुबंध होऊन जाते.प्रस्तावनेत डॉ रणधीर शिंदे लिहितात "गोविंद वायाळ यांची कविता हे एक व्याकुळ प्रीत स्मृती काव्य आहे.ती रूप संपन्न आणि रुप सुंदर आहे.तसेचं ती कोणती देहाचीआहे.गौरंगी कांतीची ती चंद्रवेलीरूपी आहे.तिच्या आठवणी सालस आहेत.ती अखंड आणि अमर्यादित आहे.तिचे वैदेही बंध 'त्याला' प्रकाश मान करणारे आहेत.या प्रेमकथेतील ती हळदीवी आहे..मात्र धुंद अशी ही अंभग प्रेमकहाणी मध्येचं दुभंगते..(प्रस्तावना)कळी काळाच्या निखळ कच्चखापी दगडी वाड्याचे अवशेष भूईकंपीत व्हावे आणि मनाने एक हळवे फुलपाखरू होऊन शोधावेत आठवांचे क्षणक्षणीचे मन मुक्त श्वास.. "दु:खाचे प्रपाती उन्माद/निरंतर कोसळतात तेव्हा कातळ केले स्वत:ला तरी/काळजावर प्रस्तर प्रहार अखंड होत असतात. सरणफुलांचे तारे होतात/अन् चंद्रच काळवंडतात"(पृष्ठ.५२)ही उध्वस्त स्वप्न प्रदेशातील कविता मनाचे विवर व घनघोर अंधार शब्द पाकळ्या ही कविता देऊन जाते.कवी गोविंद वायाळ यांची कविता निसर्ग प्रतिमा प्रतिकातून व्यक्त होताना ती ओंजळभर सुखाचा स्वानंद देते की,प्रेम ही एक मानवी मनाची भावस्पर्शी स्पंदनाची बोली होऊन जेव्हा येते तेव्हा ती जणू क्षितीजभर आपले रंग उधळत असते.हाच कवीस्नेह धागा हा अथांग होऊन जातो हे या कवितेचे श्रेयस आहे.बर्लब(पाठराखण)प्रा प्रतिभा सराफ लिहितात "कवी गोविंद संध्यास्त इंद्रधनू या अप्रतिम शीर्षकाचा कवितासंग्रह.आपण केवळ कल्पना करतो.परंतू आपली कल्पना कवितेतून सत्यात उतरलेली पाहतो तेव्हा आश्चर्यचकित होतो.निसर्गाच्या भव्य पटलावरच्या सप्तरंगात या कविता आपल्याला वास्तवात प्रेमानुभवाने भिजवून टाकतात.प्रेयसीच्या भेटीची ओढ,तिची प्रत्यक्ष भेट, तिच्या तनाचा मनातून वेध आहे.या सर्व कवितांत वापरलेल्या उपमा अलंकार, प्रतिमा,प्रतीकं, लाजवाब आहेत.'हुळहुळती लाज, स्पंदनातील ओल,कंचनी देह,राजवर्खी रुप,गौरगी कांती,कातळकोरीव शिल्प,इ.उदा देते (प्रतिभा सराफ, मुंबई)कवीवर्य गोविंद वायाळ यांच्या सृजनशील भावनेचा आदर आहेच.अतिशय आशय संपन्न कविता आली आहे.मुखपृष्ठडॉ गिरीश चरवड, पुणे यांचे आहेत.प्रा जयराम खेडेकर सरांनी हा अप्रतिम कवितासंग्रह साक्षात देखणा केला आहे.म्हणून मनस्वी हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.




**पुस्तक परिचय : डॉ प्रभाकर शेळके**
**जालना संपर्क:- ९९७५१३७३३७**



## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-